# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १७/०७/२०२६ (शुक्रवार )**

## सायबर गुन्हेगारीविरोधातील प्रभावी कारवाईत नागपूर ग्रामीण पोलीसांची उल्लेखनीय कामगिरी

**मा. पंतप्रधान, भारत यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित आगामी प्रगती** PRAGATI ( Pro & Active Governance and Timely Implementation ) **या उच्चस्तरीय बैठकीच्या पार्श्वभूमीवर नागपुर ग्रामीण जिल्हयात सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सायबर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत असलेल्या विविध उपाययोजनांमध्ये नागपूर ग्रामीण पोलीसांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. दिनांक १७/०७/२०२६ रोजी मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी बैठक घेवुन सायबर गुन्हेगारी विरोधातील कारवाईचा आढावा घेतला. या आढाव्यात नागपूर ग्रामीण पोलीसांच्या प्रभावी कामगिरीची विशेष दखल घेण्यात आली.**

**१) म्युल बँक खातेदारांविरुद्ध कारवाई** :– सायबर गुन्हयांमध्ये फसवणुकीची रक्कम स्वीकारण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या मनी म्युल बँक खातेदारांविरुद्ध नागपूर ग्रामीण पोलिसांनी तब्बल ३१ गुन्हे दाखल केले असून, **महाराष्ट्र राज्यात म्युल अकाउंट्सवर सर्वाधिक गुन्हे नागपुर ग्रामीण जिल्हयात दाखल करण्यात आले आहे.**

**२) पीडित नागरिकांचे पैसे परत** :– Money Restoration Module (MRM) च्या माध्यमातुन सायबर फसवणुकीला बळी पडलेल्या पीडित नागरिकांचे पैसे कायदेशीर प्रक्रियेद्वारे परत मिळवून देण्याच्या मोहिमेत नागपूर ग्रामीण पोलीस राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

**३) (Sahyog Portal)** द्वारे नागपुर ग्रामीण पोलीसांनी आक्षेपार्ह मजकूर डिलीट करण्यात १०० टक्के पुतर्ता केली आहे. आक्षेपार्ह आणि संशयास्पद मजकूर किंवा यूआरएल (URLs) ब्लॉक किंवा बंद (Takedown) करण्याच्या मोहिमेत नागपूर ग्रामीण पोलिसांनी यश मिळवले आहे.

४) सायबर गुन्हयांच्या तपासात विविध राज्यांतील यंत्रणांशी समन्वय साधण्यासाठीच्या CIAR (Cybercrime Investigation Assistant Request) तसेच सायबर गुन्ह्यांशी संबंधित आरोपींची माहिती अद्ययावत करण्यासाठीच्या Samanvaya Portal मध्ये सुध्दा नागपुर ग्रामीण पोलीसांची उल्लेखनिय कामगिरी आहे. सायबर गुन्हयांच्या तपासाबाबत (CIAR Request) मध्ये नागपूर ग्रामीण पोलिसांनी अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करून प्राप्त झालेल्या एकूण नोटीस /माहीतीचा पैकी ९७.२२ टक्के यशस्वी निपटारा केला आहे.

५) सायबर प्रशिक्षणाच्या CyTrain Portal वर नागपूर ग्रामीणची राज्यात तिसरी सर्वोत्तम कामगिरी असुन ५३५ पोलीस अधिकारी व अंमलदारांची नोंदणी करण्यात आली आहे.

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक,नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांनी उल्लेखनिय कामगिरी केली आहे.**

## दुकानफोडीचा गुन्हा १२ तासाच्या आत उघड,
## ९८ हजार १०० रूपयांचा संपुर्ण मुद्देमाल जप्त
## मौदा पोलीसाची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा** :– पोलीस स्टेशन मौदा अंतर्गत फिर्यादी नामे विशाल शालीकराम फंदी, वय ३१ वर्ष, रा. पावडदौना, ता. मौदा, जि. नागपूर यांनी तक्रार दिली की, दिनांक १४/०७/२०२६ चे २२.०० वा. दिनांक १५/०७/२०२६ रोजीचे ०६.३० वा. दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोरटयांनी फिर्यादीचे आयुषी मोबाईल या दुकानाचे शटरचे कुलुप तोडुन आतमध्ये प्रवेश करून १) एच.पी कंपनीचा लॅपटॉप २) एक टेक्नो कंपनीचा मोबाईल

३) सॅमसंग कंपनीचा टॅब ४) एच. के कंपनीचा टॅब ५) ईअर बड, ६) ०७ किपॅड मोबाईल ७) निक बॅन्ड ८) हेंडसेट मार्सल कंपनीचा ९) चार्जर व डाटा केबल १०) मेमरी कार्ड ०२ नग ११) ब्लुटुथ स्पीकर असा एकुण ५८,१००/—रूपयाचा मुद्द्देमाल चोरी करून घेवुन गेले. फिर्यादीचे तोंडी रीपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम ३३१(४), ३०५ (अ) भान्यासं अन्वये गुन्हा नोंद आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री. संतोष गायकवाड, उपविभागिय पोलीस अधिकारी, कन्हान उपविभाग यांच्या मार्गदर्शनात पोलीस स्टेशन मौदा येथील तपास पथकाने सदर गुन्हयांचा तपासा दरम्यान दिनांक १६/०७/२०२६ रोजी मिळालेल्या गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहितीवरून सदर गुन्हयात दोन विधीसंघर्षग्रस्त बालक यांचा सहभाग असल्याचे निष्पन्न करून त्यांना मौदा येथुन ताब्यात घेतले. त्यांच्याकडे कौशल्यापुर्ण विचारपुस केली असता त्यांनी दोघांनी मिळुन पोलीस स्टेशन मौदा परिसरात मोबाईल च्या दुकानात चोरीचा गुन्हा केल्याचे कबुल केले आहे.**अवघ्या १२ तासाच्या आत मौदा पोलीसांनी सदर गुन्हयाची उकल केली आहे.**

**पोलीसांनी पंचासमक्ष १) गुन्हयात चोरी गेलेला संपुर्ण मुद्द्देमाल किंमती ५८,१००/—रूपये, २) गुन्हयात वापरलेले दुचाकी वाहन किंमती ४०,०००/—रूपये असा एकूण किंमती ९८,१००/— रुपयांचा मुद्द्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.**



## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्रीसाठी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद, २ आरोपी अटक
## ०७ लाख १८ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त
## केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवद** :— दिनांक १६/०७/२०२६ रोजी केळवद पोलीसांना गुप्त बातमीदारद्वारे खात्रीशीर माहिति मिळाली की, चारचाकी वाहनाने अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील बिहाडा फाटा येथे नाकाबंदी केली नाकाबंदी दरम्यान संशयित कार क्र. एम एच—४०/सी एक्स—७३८२ हे वाहन मिळुन आले. पोलीसांनी वाहन थांबवुन नमुद वाहनाची तपासणी केली असता प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला.

**पोलीसांनी पंचासमक्ष ९० किलोग्रॅम सुगंधित तंबाखु एकुण किंमती १८,०००/— रूपये, कार क्र. एम एच—४०/सी एक्स — ७३८२ किंमती ७,००,०००/—रूपये असा एकुण ७,१८,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नमुद वाहन चालक आरोपी नामे १) श्री. सुरज मनोहर पाटील, वय ३१ वर्ष, रा. मु. दाढेरा, पो. तेलगांव, ता. कळमेश्वर, जि. नागपुर आणि त्याचा साथीदार आरोपी २) श्री. रोशन प्रदीपराव तलमले,**

**वय ३१ वर्ष, रा. मु. रामनगर, वर्धा, जि. वर्धा यांनी सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीतांविरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**

## अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन पाचगाव :—** दिनांक १६/०७/२०२६ रोजी पाचगाव पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता मौजा पांढरकवडा शिवार परिसरात **आरोपी नामे १) अनिकेत भगवान आंबोले, वय ३० वर्ष रा. बिडगाव, तह. कामठी, जि. नागपुर २) अरूण मेहदरसिंग यादव, वय २५ वर्षे, रा. प्रलादपुर, जि. भगवा, राज्य बिहार, ह. मु. बिडगाव, तह. कामठी, जि. नागपुर हे सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी** स्वत:चे अस्तित्व लपवुन दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने नमुद आरोपीतांचे विरूध्द कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ११ गुन्हे नोंद

दिनांक १६/०७/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन मोहाफुल दारू, देशी दारू, विदेशी दारू असा एकुण ३,६५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे मनोज सुर्यभान  कडु, वय २९ वर्ष, रा. बेला ता. उमरेड, जि. नागपुर यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे

आरोपी नामे राजेश भागचंद ठाकरे, वय ३५ वर्ष, रा.मु.पो लांबा टोला, गिरोला ता.जि. गोदीया ह.मु वार्ड क्र ०४ टाकळघाट यांचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे शैजाद सलिल शेख, वय ३५ वर्ष, रा धुरखेडा, ता उमरेड, जि नागपुर, याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन कुही** येथे आरोपी नामे गोवर्धन बंडु चौधरी, वय ३४ वर्ष, रा. मांढळ, ता. कूही, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी नामे महेश पुरुषोत्तम जावळे, वय ४७. वर्ष, रा. पिपरी, पटेल नगर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी क्रं १) आशिष अशोक नंदेश्वर, वय २८ वर्ष, रा. कचारी सांवगा, ता. काटोल, क्रं २) रत्नाकर प्रभाकर गजभिये, वय ४० वर्ष, रा. घरतवाडा ता. काटोल आणि क्रं ३) संजय प्रल्हाद गजभिये वय ४४ वर्ष रा. घरतवाडा, ता. काटोल यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे मारोती लक्ष्मण उईके वय ४० वर्ष रा. अंबाडा देशमुख त. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे नानू गूलाबराव भोंडे, वय ६० वर्ष, रा. अंबाडा, ता नरखेड, जि. नागपूर याचेवर ०१ गुन्हा नोंद.**पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे संजय नारायण उईके, वय ४७ वर्ष, रा. खापरी बारोकर याचेवर ०१ गुन्हा नोंद आहे.

**नमुद कारवाईत एकुण ३९६० मिली देशी दारू, १० लिटर मोहाफुल दारू,७२० मिली विदेशी दारू असा एकुण** ३,६५०/— **रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**